*वडिलांमागोमाग तोही त्यांच्या बिझनेसमध्ये उतरला होता. त्यात त्याचा चांगला जमही बसत चालला होता. पण बिझनेसमधल्या यशापेक्षाही समाजाकार्याचं महत्व त्याच्या लेखी कितीतरी जास्त होतं! त्याचं समाजकार्य फक्त आर्थिक मदतीपुरतंच मर्यादित नव्हतं. म्हणजे तो खूप अनाथाश्रमांना, अपंगांसाठीच्या किंवा मतिमंदांसाठीच्या संस्थांना घसघशीत देणग्या देत असेच, पण फक्त चेकवर सह्या करून त्याची सामाजिक जबाबदारी संपत नव्हती. तो त्याचा जवळजवळ सगळा रिकामा वेळ याच कामांमध्ये घालवायचा-अंधशाळेत आठवड्यातून दोनवेळा शिकवणे, मतिमंदांसाठी करमणुकीच्या कार्याक्रमांचं आयोजन करणे, झोपडपट्टीतल्या लोकांसाठी कॅम्प घेणे, आजूबाजूच्या आदिवासी खेड्यांना भेटी देवून तिथे नवनवीन सुधारणा करणे-एक ना दोन! बिझनेस आणि समाजकार्य याच्या पलीकडे त्याला बाकी काही आयुष्यच नव्हतं....*

*सलीलच्या आईवडिलांची त्याच्या या कामाबद्दल काही तक्रार नव्हती. कारण तक्रार करण्यासाठी सलीलबरोबर फारसा वेळ घालवण्याची त्यांना संधीच मिळायची नाही! सगळे लोक त्याच्या समाजकार्याबद्दल त्याचं कौतुक करायचे तेव्हा त्यांना पण अभिमानच वाटायचा. त्यामुळं त्या दोघांना नाराजी दाखवायला काही कारणच नव्हतं...जोपर्यंत त्यानं त्या दोघांना सांगितलं नव्हतं की त्यानं एका वेश्येशी लग्न करायचा निर्णय घेतला आहे तोपर्यंत!*

अतिशय तीव्र सामाजिक बांधिलकी असलेला सलील हा धक्कादायक निर्णय घेतो. त्याच्या विरोधात बोलायची कुणाचीच हिंमत नसते, पण त्याला एका व्यक्तीकडून अनपेक्षितरित्या विरोध होतो. वाचा ‘उपकार’ या कथेत…